O. I. G. S
BOOK-POST

जा क्र मराशैसंवप्रप/संशोधन/2011-12/1448
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद(विद्यापरिषद) पुणे-30
दिनांक 30. 5. 2012

4.6.12

प्रति,

सर्व
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
शिक्षण विभाग जि. प. बिड
शिक्षण निरिक्षक ---------

विषय :- विपश्यना अभ्यासक्रमाबाबत प्रश्नावली भरून पाठविणेबाबत

संदर्भ :- मा. डॉ. प्रेमसिंग मीना अप्पर मुख्य सचिव (साविस) यांचे अशा. पत्र क्र. – दि. 18/5/2010.

उपरोक्त संदर्भिय पत्रानूसार विपश्यना अभ्यासक्रमाबाबत शासनाने खालील तीन मुद्यांवर अभिप्राय मागविलेले आहेत.

1) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमात विपश्यना अभ्यासक्रम अंतर्भूत करणे.

2) अध्यापक विद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य असलेल्या 15 दिवसाच्या निवासी शिबीरात पहिले 10 दिवस विपश्यना अभ्यासक्रम व त्यापुढील 5 दिवसात त्यांच्या नियमित अभ्यासक्रमातील 10 उपक्रम घेणे.

3) विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुटने आयोजित केलेल्या विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करणा-या शिक्षकांना त्यांनी नियमित सेवांतर्गत प्रशिक्षण पुर्ण केले आहे असे गृहित धरून त्यांना वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देणे.

तेव्हा उपरोक्त तिन मुद्यांना अनुसरून प्रश्नावली सोबत देण्यात आलेली आहे.
या प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाचे सविस्तर आणि स्पष्ट उत्तरे लिहून स्वाक्षरीसह या कार्यालयास संशोधन विभागप्रमुख म. रा. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्यापरिषद) सदाशिव पेठ, पुणे 30. या पत्त्यावर अथवा खास दूतामार्फत दि. 20/6/2012 पर्यंत पाठवावी.

प्रश्नावली जिल्हयातून खालील 15 व्यक्तींकडून भरून पाठवावी.

1) प्राथमिक शिक्षक : 4

2) माध्यमिक शिक्षक : 4

3) बी एड प्राध्यापक : 1

4) डी टी एड अध्यापकाचार्य : 2

5) प्रशासकीय अधिकारी : 2

6) डायटमधील ज्येष्ठ अधिव्याख्याता/अधिव्याख्याता : 2

उपरोक्त व्यक्तींनी किमान 10 दिवसाचे विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा.

आपण सोबत दिलेल्या प्रश्नावलीच्या पुरेशा प्रती झेरॉक्स करून वरील संबंधित 15 व्यक्तींकडून भरून घ्यावी व त्या संकलित करून त्वरीत या कार्यालयास सादर करण्यात याव्यात.

सोबत : प्रश्नावली

संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद(विद्यापरिषद)
पुणे-30

प्रतिलीपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक विभाग ---------------

## विपश्यना अभ्यासक्रम बाबत प्रश्नावली

नाव :- ------------------------------ पद : ------------------

कार्यालय/शाळेचा संपूर्ण पत्ता :-

शैक्षणिक अर्हता :-

सेवाकाल/अध्यापन अनुभव :-

फोन नं :-

जन्मतारीख :-

1) आपणास विपश्यना शिबीर याबाबत माहिती आहे काय?
होय/नाही

2) आपण विपश्यना शिबीर केले आहे काय?
होय/नाही

3) विपश्यना शिबीर केले असल्यास किती दिवसांचे केले?

----------------------------------------

4) विपश्यना साधनेचा साधक शिक्षकावर कोणत्या प्रकारचा सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे असे आपणास वाटते?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

5) शिक्षकांनी विपश्यना अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण विपश्यना केंद्रातच पूर्ण करण्याची आवश्यकता आहे काय? कारणासह स्पष्ट मत नोंदवा

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

6) डी. टी. एड/बी.एड अभ्यासक्रमात विपश्यना अभ्यासक्रम समाविष्ट केल्यास प्रशिक्षणार्थी यांच्यावर कोणते परिणाम दिसून येतील?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

7) विपश्यना अभ्यासक्रम राबवितांना काही अडचणी येतील काय? कोणत्या?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

8) अडचणी येत असल्यास त्याचे निराकारण कसे करता येईल असे तुम्हाला वाटते?

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

9) दरवर्षी होण-या प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमात विपश्यना अभ्यासक्रमाचा समावेश करावा किवा नाही? कारणासह स्पष्ट मत नोंदवा

---

---

---

10) होय मत असल्यास विपश्यना अभ्यासक्रमाचा कालावधी किती दिवसांचा असावा?

---

11) डी. टी. एड अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष समाजसेवा शिबीरामध्ये 15 दिवसांपैकी 10 दिवस विपश्यना साधना शिबीर (समाजसेवा ठिकाणी) घेणे योग्य होईल असे वाटते का? कारणासह तुमचे मत स्पष्ट करा

---

---

---

---

12) सदरील विपश्यना अभ्यासक्रम स्थानिक निवासी शिबीरात का विपश्यना केंद्रावर घेण्यात यावे याबददल आपले स्पष्ट मत कारणासह नोंदवा

---

---

---

13) डी टी एड अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला अनिवार्य असलेल्या 15 दिवसांच्या निवासी शिबीरात (समाजसेवा शिबीरात) 10 दिवस विपश्यना अभ्यासक्रम समाविष्ठ करावा किंवा नाही? कारणासह स्पष्ट मत नोंदवा

---

---

---

14) होय मत असल्यास स्थानिक पातळीवर विपश्यना अभ्यासक्रम राबविण्यासाठी कोणत्या भौतिक सुविधांची गरज भासेल?

---

---

---

15) विपश्यना अभ्यासक्रम निवासी शिबीरात राबवितांना येणा-या संभाव्य अडचणी कोणत्या ते तुमच्या मते लिहा

---

---

---

16) श्रम संस्कार शिबीरासाठी 10 दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम घेणे योग्य होईल किंवा नाही ते कारणासह स्पष्ट करा

17) विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुटने आयोजित केलेल्या विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण करणा-या शिक्षकांना त्यांनी नियमित सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले आहे असे गृहीत धरून त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे तुमच्या मते योग्य आहे काय? योग्य असल्यास कारण द्या?

18) वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी आवश्यक असणा-या तिन आठवडयाच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाऐवजी 10 दिवसांचे विपश्यना प्रशिक्षण ग्राह्य धरावे काय?

19) वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी आवश्यक असणा-या तीन आठवडयाच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाऐवजी 10 दिवस विपश्यना अभ्यासक्रम व 11 दिवस इतर अभ्यासक्रमावरील नियमित सेवांतर्गत प्रशिक्षण असे एकूण 21 दिवसांचे प्रशिक्षण ग्राह्य धरावे काय?

20) वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी तुमच्या मते वेगळा काही अभिप्राय असल्यास तो नोंदवावा.

21) विपश्यना अभ्यासक्रम तुमच्या शाळेत तुम्ही कशाप्रकारे राबवाल व त्यानूसार शाळेतील दैनंदिन कार्यक्रमाचे स्वरूप कसे ठेवाल?

स्वाक्षरी :-

**टिप :- आवश्यक वाटल्यास स्वतंत्र कागदावर सविस्तर अभिप्राय सोबत जोडावा.**